# जाहीर प्रकटन

## इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २००९-१०

**मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील सुचनांचा अवलंब करावा.**

१. एस.एस.सी. व सी.बी.एस.ई. बोर्डाकडील इ.१० वीच्या विद्यार्थ्यांसंदर्भातील निकालाची माहिती **(http://fyjc.org.in/mumbai)** या संकेत स्थळावर टाकण्यात आलेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरतांना त्यांचा परीक्षा बैठक क्रमांक टाकल्यावर इतर वैयक्तिक माहिती आपोआप ऑनलाईन प्रवेश अर्जात उपलब्ध होणार आहे. आयसीएसई / आयजीसीएसई / आयबी / एनआयओएस तसेच महाराष्ट्र राज्य सोडून इतर बोर्डाची माहिती वेबसाईटवर उपलब्ध नसल्याने सदर बोर्डाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतांना स्वतःची सर्व वैयक्तिक माहिती परीक्षा बैठक क्रमांकासह भरावी लागणार आहे.

२. जे विद्यार्थी मुंबई बाहेरुन मुंबईमध्ये एमएमआरडीए क्षेत्रात आलेले आहेत व एमएमआरडीए क्षेत्रातील कॉलेजात प्रवेश घेऊ इच्छितात ते सध्या जेथे राहतात तेथील पत्ता, पिन कोड क्रमांक, प्रवेश अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. व त्या पत्यानुसार झोन क्रमांक प्रवेश अर्जात देणे आवश्यक आहे. झोन सेंटरची माहिती वेबसाईटवर व माहिती पुस्तिकेत उपलब्ध आहे.

३. विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेमध्ये व मुंबई बाहेरील विद्यार्थ्यांना शिक्षण उपसंचालक कार्यालय चर्नी रोड (प.) मुंबई यांनी सुरु केलेल्या झोनल समन्वय केंद्रावर माहिती पुस्तिका उपलब्ध होणार आहेत. सदरहू माहिती पुस्तिका विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वाचावी व त्यानुसार ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा.

४. विद्यार्थ्यांने आपणास हवे असलेल्या शाखेनुसार कॉलेज निवडतांना संबंधित कॉलेजचे गतवर्षीचे कट ऑफ मार्कस (शेवटच्या विद्यार्थ्यांचे गुण) लक्षात घेऊन कॉलेजचा प्राधान्यक्रम ठरवावा व त्यानुसार कॉलेजचे सांकेतांक कच्च्या प्रवेश अर्जावर लिहून ठेवावे. व ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना त्याचा वापर करावा.

५. विद्यार्थ्यांनी माहिती पुस्तिकेतील अथवा वेबसाईटवरील झोन क्रमांक, त्यात समाविष्ठ असणारे वॉर्ड, त्या वॉर्डात समाविष्ट असणारा भाग, त्याचप्रमाणे त्या झोनचे समन्वय केंद्र याची पूर्ण माहिती घ्यावी.

६. अल्पसंख्यांक व एम.सी.व्ही.सी.चे प्रवेश याबाबत संबंधित उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर ऑफ लाईन पध्दतीने होणार आहेत. संबंधित विद्यार्थ्यांनी सदरहू कॉलेजमध्ये परस्पर अर्ज करावेत.

७. सर्व बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी इ.११ वीचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरल्यानंतर त्याच्या दोन प्रिंट आऊट घेऊन, आवश्यक ती कागदपत्रे व रु.१२५/- फी सह त्यांच्या प्रवेश अर्जात नमूद केलेल्या सादरीकरण केंद्रावर सादर करावे.

८. ज्या शाळेत संगणक व इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही. त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज भरण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने जवळच्या सुविधा असलेल्या माध्यमिक शाळा मदत केंद्र म्हणून निश्चित केल्या आहेत. तेथे विद्यार्थ्यांना सकाळी १०.०० ते सायं.५.०० या वेळेत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास मदत मिळेल.

९. (M.M.R.D.A.) क्षेत्रातील अलिबाग, पेण, खोपोली, खालापूर, कर्जत, उरण या क्षेत्रातील इ.११ वी प्रवेश ऑनलाईन न होता कॉलेजस्तरावर ऑफ लाईन पध्दतीने होतील.

**१०. ऑनलाईन सरावासाठी मिळालेले Login ID, Password व इतर कॉलेजची माहिती कोड क्रमांक सरावासाठी होते, त्यामुळे त्याचा वापर करु नये. दि.२६.०६.०९ पासून भरलेल्या प्रवेश अर्जानुसार मिळालेला Login ID व Password वापरावा. तसेच कॉलेज कोड क्रमांक माहिती पुस्तिकेप्रमाणे व दि.२६.०६.२००९ पासून या (http://fyjc.org.in/mumbai या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या कॉलेज कोड क्रमांकाचा प्राधान्य क्रम ठरविण्यासाठी उपयोग करावा.**

**११. विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरतांना काही अडचण आल्यास अथवा अधिक माहिती हवी असल्यास हेल्प लाईन क्रमांक (022-67609211), (022-67609222) अथवा** M.K.C.L. **ची वेबसाईट (http : // fyjc.org.in/mumbai) भेट देणे.**